**मे. कुकडी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, पिंपळगांव पिसा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या नविन ६० हजार लिटर प्रति दिन क्षमता असलेल्या मळीवर आधारित आसवनी प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतचा इतिवृत्तांत :**

.............................................................................................................................

मे. कुकडी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, पिंपळगांव पिसा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या नविन ६० हजार लिटर प्रति दिन क्षमता असलेल्या मळीवर आधारित आसवनी प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सदर कारखाना परिसरात दि. २८ मे २०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-18/2019, पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्ल्यूपीसी) / पीएच / बी - 1716, दि. 21-05-2019. अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात आली. त्यास अनुसरुन सदर सुनावणीस पुढीलप्रमाणे सदर समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

१. श्री. प्रशांत पाटील
निवासी उपजिल्हाधिकारी तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर : अध्यक्ष

२. श्री.प्र.म.जोशी.
प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नाशिक : सदस्य

३. श्री. अजित पाटील
उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, अहमदनगर : समन्वयक

श्री. अजित पाटील, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

सदर उदयोगाने पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केला होता. भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या दि. १४-०९-२००६ च्या नोटीफिकेशन नुसार सदर उदयोगास पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेणे बंधनकारक आहे. सदर प्रकल्पासंबंधीची माहिती असलेले दस्तऐवज खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध होते.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
२. जिल्हा उदयोग केंद्र, अहमदनगर
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर
४. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
५. मुख्यालय, मप्रनि मंडळ, मुंबई.
६. प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, नाशिक.
७. प्रांत अधिकारी कार्यालय, अहमदनगर.
८. तहसिल कार्यालय, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि.अहमदनगर
९. ग्रामपंचायत कार्यालय, सुरेगांव, कोरेगव्हाण, एरंडोली, मुंगुसगांव, देवदैठण, येणपाने, कोंडेगव्हाण, पिंपळगांव पिसा, बेलवंडी बु. भानगांव, विसापूर, लोणी व्यंकनाथ, उक्कडगांव, पिंप्री, कोलंदर, कोळगांव, घारगांव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीची सुचना दि. २६/०४/२०१९ रोजी इंग्रजी वर्तमानपत्र – टाईम्स ऑफ इंडीया, व मराठी वर्तमानपत्र दै.लोकमत मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती व या सुचनेत सदर प्रस्तावा संबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका – टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर सुनावणीचे आयोजन करण्यात आल्याचे नमुद केले आहे. तसेच सदर प्रकल्पा बाबत कोणताही लेखी वा तोंडी आक्षेप उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळाकडे प्राप्त न झाल्याचे त्यांनी नमुद केले.

समन्वयक यांनी अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती यांना सदर प्रकल्प धारकांस / त्यांचे प्रतिनिधीस सादरीकरण करण्याचे आदेशित करण्याची विनंती केली. तसेच त्यांनी नमुद केले की, अद्याप पावेतो सदर प्रकल्पाबाबत कोणतीही लेखी हरकत प्राप्त झालेली नसून कोणास कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याचे आदेशित केले.

प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांनी पर्यावरणविषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाद्वारे उपस्थितांना दिली असून सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इंग्रजी इतिवृत्तांत समाविष्ट करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर मा. अध्यक्षांनी उपस्थितांना आपल्या लेखी / तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गांव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवा.

**जनसुनावणी इतिवृत्त (प्रोसेडिंग) :**

१. प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नाशिक तथा सदस्य जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सादरीकरणात कांही मुददे चुकीचे दाखविण्यात आल्याचे नमुद केले. उदयोग स्थापन करण्याचे संमतीपत्र मप्रनि मंडळाने प्रदान केले आहे त्याबाबत कांहीच उल्लेख करण्यात आलेला नाही. जसे की, स्पेंट वॉश संमतीपत्रात ९६ टन /दिन नमुद करण्यात आलेला आहे तुम्ही १६१ टन /दिन म्हणता. पाण्याचा वापर १०३९ आहे ते सादरीकरणामध्ये १२०० च्या वर चालले. तसेच संमतीपत्रात ८२ मीटर उंचीची चिमणी उभारण्याचे नमुद केलेले असतांना सादरणीकरणात ७५ मीटर उंचीची चिमणी उभारली जाईल असे नमुद केले आहे.

सदर मुदयास अनुसरुन सदर कारखान्याचे प्रतिनिधी यांनी सांगितले की, निर्माण होणारा स्पेंट वॉश लिटरमध्ये मोजला जातो आणि जो जाळणार आहोत तो टनामध्ये आहे. स्पेसिफीक ग्रॅव्हीटीनुसार त्याच वजन ८.२४ एवढे होते. पाण्याच्या वापराबाबत त्यांनी नमुद केले की, १२७२ घ.मी./दिन रिसायकल करणार आहोत व ५९० घ.मी./दिन आवश्यकता असणार आहे. सदर आकडेवारी वेगवेगळया एककामध्ये दिली असल्यामुळे चुकीचे वाटते असे नमुद केले.

अध्यक्ष जाहीर लोकसुनावणी समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांनी कागदपत्रांची पडताळणी करुन स्पष्टीकरण करण्याचे सुचित केले. कारखान्याच्या प्रतिनिधींनी चिमणीच्या उंचीबाबत नमुद केले की, इमीशनचे कॅलक्युलेशन करुन ७५ मीटर उंची सादरीकरणात नमुद केली आहे. मप्रनि मंडळाने प्रदान केलेल्या संमतीपत्रात ८२ मीटर उंचीची चिमणी उभारण्याचे आदेशित केले आहे. तसेच त्यांनी नमुद केले की, इन्हायर्नमेंट क्लीअरन्स मधील अटी व शर्ती व मप्रनि मंडळाने संमतीपत्रात नमुद केलेल्या अटी व शर्तींचे पालन करण्यात येईल.

अध्यक्ष जाहीर लोकसुनावणी समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांनी उपस्थितांना आपले प्रश्न लेखी / तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडण्याची विनंती केली त्यास अनुसरुन उपस्थितांनी खालीलप्रमाणे प्रश्न उपस्थित केले.

२. श्री. प्रमोद सोमीनाथ इथापे. रा. मुगूसगांव, ता. श्रीगोंदा यांनी नमुद केले की, मी सभासद शेतकरी आहे. प्रस्तावित प्रकल्प ही बाब मोलाची म्हणावी लागेल. हा प्रकल्प झाला तर उसाला भाव मिळण्यास हातभार लागेल. सदर उदयोगापासून कमीत कमी प्रदूषण व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

३. श्री. विष्णू ज्ञानदेव जठार. रा. विसापूर यांनी नमुद केले की, प्रदूषण नियंत्रण मंडळाने ज्या अटी व शर्ती घातल्या आहेत त्याचे पालन केले पाहिजे. प्रदूषण कमी करण्यासाठी सदर प्रकल्प सुरु करण्याच्या आधी वृक्ष लागवडीची अट टाकण्याची विनंती केली.

४. श्री. राजेंद्र दत्तात्रय पवार. रा. येलपणे यांनी नमुद केले की, प्रकल्पाच्या उत्पादन प्रक्रियेतून जे दूषीत पाणी उत्पन्न होईल त्याचा शेतीवर व पिकावर कांही परिणाम होईल का याबाबतची माहिती देण्याची विनंती केली.

५. श्री. रोशन बापूराव लिंभोरे. रा. घारगांव यांनी नमुद केले की, या प्रकल्पामुळे हवेचे प्रदूषण वाढणार आहे काय त्याचे परिणाम काय होतील याबाबत माहिती देण्याची विनंती केली.

६. श्री. नाथा दगडू शेंडगे. रा. खरातवाडी यांनी नमुद केले की, बाय प्रॉडक्ट असल्याशिवाय शेतक-याला दोन पैसे मिळणार नाहीत. काही अडीअडचणी असतील तर सहकार्य करावे अशी विनंती केली.

७. श्री. नवनाथ डोके. सरपंच रा. तरडगव्हाण यांनी प्रस्तावित प्रकल्पाला शुभेच्छा दिल्या. कारखान्यावर जास्तीत जास्त झाडे लावण्याची विनंती केली.

८. श्री. सुभाष पंदरकर. ग्रामपंचायत सदस्य, पिंपळगांव पिसा यांनी शेतीवर व मानवी जीवनावर काही परिणाम होईल का याबाबतचा मुददा उपस्थित केला.

९. श्री. तुकाराम डोंगरे. रा. कोंडे गव्हाण यांनी मुददा उपस्थित केला की, इथेनॉल किंवा स्पिरीट हा प्रॉडक्ट विस्फोटक आहे त्यामुळे आजूबाजूच्या परिसराला धोका होऊ शकतो काय याबाबत आपले काही निकश असतील तर ते सांगावे.

वरील प्रश्नांना डॉ. अमोल देशमाने, वैज्ञानिक पर्यावरणशास्त्र विभाग, वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, पुणे यांनी खालीलप्रमाणे उत्तर दिले.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत आसवनी उदयोगांना शुन्य उत्सर्जनची अट घातली जाते. तयार होणारे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट कारखाना परिसरातच केली जाईल. प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक ती सयंत्रणा उभारली जाईल. त्याच्यामध्ये एक बाष्पक लावले जाईल.त्या बाष्पकाचे मुख्य कार्य काय असत तर पाण्यात जे सांडपाणी येईल त्यातल पाणी इव्हॅपोरेट करायच / पाण्याचे वाफेमध्ये रुपांतर करायच आणि जी वाफ तयार होणार आहे त्या वाफेला परत थंड करुन त्याच पाण्यामध्ये रुपांतर होईल. चांगले म्हणजे १०० टक्के पाणी चांगल नसते त्यामध्ये थोडीशी अशुध्दी असते. परंतु त्याच्यावर प्रक्रिया करुन ते पाणी परत वापरले जाते. ती प्रक्रिया करण्यासाठी आपल्याकडे कंडेनसेट पॉलीसी युनिट (सीपीयू) लावणार आहोत. सांडपाण्याची बाष्पकाच्यामार्फत वाफ होणार ती वाफ थंड करुन पुन्हा या सीपीयूमध्ये प्रक्रिया केलेले पाणी पुन्हा आपण आसवनी प्रकल्पामध्ये वापरणार आहोत. वाफेला घटट केल्यानंतर जो कान्सेंट्रेटेड स्पेंट वॉश राहतो ज्याच्यातील घनपदार्थांची संख्या जवळपास ५६ ते ६० टक्के इतकी असते. अशा प्रकारचा स्पेंट वॉश हा सगळयात शेवटी इनसिनेरेशन बॉयलरमध्ये जाळून टाकला जाणार आहे. १०० टक्के त्याची विल्हेवाट लागणार आहे कारण प्रदूषित पाणी आहे ते घटट झालेल पाणी आहे ते जाळून टाकणार आहे ज्याच्यापासून जी वाफ तयार होते त्या वाफेत आपण सीपीयूमध्ये ट्रीटमेंट करुन पून्हा वापरणार आहोत. स्पेंट वॉशच्या जोडीला अजून एक सौम्य स्वरुपाचा एक वेस्ट वॉटर तयार होते म्हणजे प्रदूषित पाणी तयार होते त्याला म्हटल जात स्पेंट लिचेट याच्यामध्ये प्रदूषणाची तीव्रता खूपच कमी असते. सीपीयूमध्ये आपण ट्रीट करणार आहोत आणि हे ट्रीट केलेल पाणी आपण परत वापरणार आहोत.

याच्यामुळे ओव्हरऑल हे जे स्पेंट वॉश किंवा स्पेंट लिचेट आहे, प्रदूषित आहे ते कारखाना परिसराच्या बाहेरच जाणार नाही आणि हे परिसराच्या बाहेरच न गेल्यामुळे जो प्रश्न होता त्याच्यातून प्रदूषित पाणी त्याचा मानवी जीवनावर किंवा शेतीवर काही परिणाम होणार आहे का तर तशी कांहीही शक्यता नाही आहे कारण या दोन्ही गोष्टींवर मा. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे बंधन आहे. म.प्र.नि.मंडळाकडे देखील आम्ही उदयोग सुरु करण्यासाठी अर्ज सादर करु त्यावेळी उदयोग सुरु करण्याच्या संमतीपत्रामध्ये वेगवेगळया अटी शर्ती टाकून दिल्या जातील आणि त्या अटी व शर्तींची पुर्तता करण हे कायदयाने आम्हाला बंधनकारक आहे. आम्हाला पर्यावरण विषयक मंजूरी मिळणार आहे त्यासाठी पण अशा प्रकारच्या अटी असतील.

वायू प्रदूषणासाठी तर या प्रकल्पामध्ये आपण मघाशी पण पाहील. वायू प्रदूषण जे आहे ते चिमणीतून बाहेर पडणारा धूर याच्यामधूनच आणि त्याच्यासाठी आपण इलेक्ट्रोस्टॅटीक पर्सीपीटेटर नांवाची अत्याधुनिक वायू प्रदूषण यंत्रना आपण बसवणार आहोत. तशा प्रकारच्या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सुचना आणि पर्यावण विषयक अनुमती मध्ये त्याची अट घातली जाते. इएसपी लावल्यामुळे एसपीएम, पारटीक्युलेट मॅटर, धुलीकण नियंत्रण होण्यासाठी खूप मोठी मदत मिळणार आहे आणि त्यामुळे सभोवतालच्या परिसरावर काही परिणाम होण्याची शक्यता नाही.

शेतीवर किंवा मानवी जीवनावर वाईट परिणाम होईल या ज्या शंका होत्या त्या दोन्ही उत्तरांच निरसर झाल असाव.

स्टोरेजमुळे काही आपत्तीजनक धोका आहे का याबाबत असे नमुद करतो की, स्टोरेज बाबत पेसो नावाच्या गाईडलाईन्स आहेत. पेसो म्हणजे पेट्रोलियम आणि सेफटी ऑरगॅनायझेशन. केंद्र सरकारची ही एक संस्था आहे. त्या संस्थेने गाईडलाईन दिलेल्या आहेत. ज्या स्टोरेज टॅंक आहेत त्यांच्याभोवती विशिष्ट मिटरचा भाग आम्हाला मोकळा सोडावा लागतो. तो १५ मीटरचा असतो आणि त्याच्यासाठी त्यांनी खूप अभ्यास केलेला आहे. तर या गाईडलाईन्स ठरविलेल्या आहेत. तो १५ मीटरच का किंवा त्याच्यापेक्षा कमी का नाही चालणार तर १५ मीटरची ही जी गाईडलाईन आहे त्यानुसार आम्ही १५ मीटर पूर्ण परिसराभोवती स्टोरेजआहे त्याच्याभोवती पटटा असणार आहे.

सर्व पुर्तता सादर केल्यानंतर पेसो त्याला मोहर लावतो. त्यानंतरच आम्हाला स्टोरेजची परवानगी मिळते. जोपर्यंत ती परवानगी मिळत नाही तोपर्यंत प्रकल्प कार्यान्वित होऊ शकत नाही. तसेच संबंधित सुचना पर्यावरण विषयक मंजूरीमध्ये येतील किंवा संबंधित विभागांकडून प्राप्त होतील त्या सर्वांचे पूर्ण पालन केले जाईल किंवा सुरक्षिततेमध्ये कोणतीही जोखीम घेतली जाणार नाही. सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी / जी काही रिस्क आहे ती शून्य लेव्हल पर्यंत आणण्याची जबाबदारी मा. संचालक मंडळ यांनी घेतल्याचे आम्हाला सांगितले आहे. त्याचप्रमाणे इआयए रिपोर्टमध्ये तुम्ही जे पाहील असेल त्या सर्वच सूचनांचा समावेश केलेला आहे आणि त्याप्रमाणे या प्रकल्पाची उभारणी केली जाईल. मला वाटते आपल्याकडील ज्या शंका प्रश्न उपस्थित करण्यात आल्या त्याच उत्तर देण्यात आलेल आहे. एक दोन ग्रामस्थांनी प्रकल्प व्हावा म्हणून शुभेच्छा व्यक्त केलेल्या आहेत त्यांच मी मा. संचालक मंडळातर्फे आभार मानतो. एक दोन ग्रामस्थांनी ग्रीन बेल्ट डेव्हलपमेंटसाठी प्रश्न उपस्थित केले. मा. संचालक मंडळ आधीपासूनच ग्रीन बेल्ट डेव्हलपमेंट करुन किंवा झाडे डिस्ट्रीब्यूट करुन यासारख्या ॲक्टीव्हीटी गेले अनेक वर्ष राबवित आले आहेत. आपल्या कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक सर्वांचे परिचयाचे आहेत त्यांच्यामार्फत किती वृक्ष लागवड किंवा वेगवेगळे वृक्षारोपनाचे कार्यक्रम झालेले आहेत याची आपणा सर्वांनाच माहिती आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून ज्या काही अटी आणि शर्ती येतील त्या सर्वांची पुर्तता केली जाईल आणि त्यानंतरच हा प्रकल्प कार्यान्वित होईल असे मी या ठिकाणी नमुद करतो.

---

प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नाशिक तथा सदस्य जाहीर लोकसुनावणी समिती यांनी नमुद केले की, ध्वनी पातळी विहित मर्यादे बाहेर झाल्याचे, पिंपळगांव पिसा येते पीएम१०, ६१.४७ आणि भुजलाचे एकूण जडपणा, तांबे विहित मर्यादे बाहेर आहे. एकुण अल्कलॅनिटी ती सुध्दा ब-याच ठिकाणी विहित मर्यादे बाहेर आहे. मॅग्नेशियमही जास्त आहे. ते सादरणीकरणा दरम्यान सांगितले नाही हे सांगणे आवश्यक होते.

श्री. केशव रेडडी, हैद्राबाद यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पास शुभेच्छा दिल्या. त्यांनी नमुद केले की, सदर उदयोग शेतक-यांच्या जीवनमानाशी संबंधित आहेत. इएसआर फंडातील रक्कमेचा वापर १० कि.मी.च्या परिघातील गांवासाठीच करण्यात यावा. पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मडळाच्या नियमांचे पालन करण्यात यावे. कारखाना परिसरात ३३ टक्के पेक्षा अधिक क्षेत्रावर हरित पटटा विकसित करण्यात यावा.

अध्यक्ष जाहीर लोकसुनावणी समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांनी नमुद केले की, आपण सर्वजण येथे उपस्थित झाले आहात, आपण जे आक्षेप / प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत. त्याचप्रमाणे मप्रनि मंडळाचे प्रादेशिक अधिकारी यांनी जे कांही प्रश्न उपस्थित केले आहेत त्या सर्वांची नोंद आजच्या इतिवृत्तांतामध्ये घेतली ~~जाईल~~ आहे. आपण सर्वांनी आजच्या सुनावणीमध्ये उपस्थित राहून आपले अभिप्राय मांडले व सहकार्य केले त्याबददल मी मनपुर्वक आभार मानतो आणि आजची जनसुनावणी संपल्याचे मी जाहीर ~~करतो~~ केले. धन्यवाद.

( अजित पाटील )
समन्वयक तथा उप-प्रादेशिक अधिकारी,

( प्र.म.जोशी )
सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

( प्रशांत पाटील )
अध्यक्ष
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर